Anekant Education Society's

# Tuljaram Chaturchand College, Baramati

# Notice

Displayed on : ~~05/09/2020~~ 2 SEP 2021 Notice No. 98

## भारत सरकारची (सेंट्रल सेक्टर) महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षण घेणा—या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सन २०२१—२०२२

उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी/मार्च २०२१मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी पदवी वर्गातील प्रथम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांना नवीन अर्ज व पदवी वर्गातील व्दितीय व तृतीय वर्षासाठी व पदव्युत्तर वर्गातील प्रथम व व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांना नूतनीकरण करणेसाठी अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने मागविण्यात येत आहेत. आर्फलाईन अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**केंद्रशासनामार्फत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ आहे.**

**नवीन मंजूरीसाठी (Fresh)ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या Top 20th Percentile Merit List मध्ये समावेश आहे, त्याच विद्यार्थ्यांचे नवीन मंजूरी (Fresh) शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन (Online) भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्या यादीत नाव असेल अशाच विद्यार्थ्यांनी फॉर्म भरावयाचा आहे व सदर विद्यार्थ्यांनी दुस—या कोणत्याही शिष्यवृत्तीचा फॉर्म भरलेला नसावा.**

**किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.

३. अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.

४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

५. कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पाच वर्षापर्यंत शिष्यवृत्ती देय राहील.

६. या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना बँक खात्यामध्ये केंद्र शासनाच्या कडून परस्पर जमा करण्यात येणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी जवळच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून त्याचा खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी., एमआयसीआर कोड अर्जामध्ये अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे. अन्यथा सादर केलेला अर्ज शिष्यवृत्तीस पात्र ठरणार नाही. तसेच नमूद बँक खाते क्रमांक हा त्याच्या आधार कार्ड क्रमांकाशी संलग्न (Link) असणे अत्यावश्यक आहे.

७. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याचा बँक खाते क्रमांक मेजर असावा व जाईंट खाते नसावे.

८. जे विद्यार्थी एस.टी, एस.सी, एन.टी, ओ.बी.सी, एस.बी.सी, राजर्षी शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना या कॅटेगरीतील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा प्रवेश फी सवलतीमध्ये घेतलेला आहे. व महाडीबीटीवर स्कॉलरशिचा फॉर्म भरलेला असल्यास अशा विद्यार्थ्यांना सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिपचा फॉर्म भरता येणार नाही विद्यार्थ्यांना एका वेळेस एकाच योजनेमधील शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे :–**

**नवीन मंजुरी /(Fresh)**

**१. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.**

**२. पालकांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र २०२०–२१ चे तहसिलदार यांनी दिलेले असावे**

**३. डोमासाईल सर्टीफिकेट व जातीचा दाखला**

**४. आधारकार्ड/बँक पासबुक झेरॉक्स**

**५. राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक झेरॉक्स**

**६. प्रवेश चलन**

**७. अर्जावर विद्यार्थ्यांचा फोटो**

- <u>शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal)</u> :

१. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी मागील वर्षाची गुणपत्रिका ऑनलाईन अपलोड करावी लागेल.

२. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज पुढील कार्यवाहीसाठी विचारात घेतले जाणार नाही.

३. नुतनीकरणाच्या अर्जासोबत मागील वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत व राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत सोबत जोडावी.

४. विद्यार्थ्याच्या अर्जासोबत आधार कार्ड असणे आवश्यक आहे. तसेच त्याचा आधारक्रमांक हा त्याच्या बँक खात्याशी संलग्न असणे आवश्यक आहे.

• <u>नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी अर्ज करण्याची कार्यपध्दती:—</u>

**१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी** www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.

२. नवीन मंजुरीसाठी ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक मंडळाच्या TOP 20 Th Percentile merit list समावेश असेल त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन भरले जातील. सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhpune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात आलेली आहे.

३. ज्या विद्यार्थ्यांकडे आधारक्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधारक्रमांक या पर्यायाचा वापर करुन भरावा. आधारकार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विद्यार्थ्यांनी आधार नोंदणी आय.डी.स्लीप किंवा बॅंक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करुन अर्ज भरावा.

४. विद्यार्थ्यांना लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बॅंक खात्याशी संलग्न (लिंक)असणे आवश्यक आहे. व बॅंक खाते विद्यार्थ्यांचे स्वत:चे असावे जॉईट खाते नसावे.

५. ऑनलाईन अर्ज भरताना होम पेज वरील सर्व माहिती वाचून अर्ज भरावा व ऑनलाईन अर्ज भरुन झाल्यानंतर परिपूर्ण अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासहित महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

**रिनिवल मंजूरीच्या अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :**

१. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो).
२. मार्च /एप्रिल—२०२१ गुणपत्रिकेची प्रत
३. राष्ट्रीयकृत बॅंक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत.
४. आधारकार्डाची छायांकित प्रत
५. प्रवेश चलनाची झेरॉक्स.
६. जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत.

**तरी, विद्यार्थ्यांनी नवीन व नूतनीकरण ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट आवश्यक त्या कागदपत्रांसहित दि. ०५/१२/२०२१ पर्यंत 'प्रशासन भवन' येथे जमा करावेत याची विद्यार्थ्यांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.**

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\users\amsolankar\Scholarship 2021-22\Scholarship Notice 2021-22\Central Sector Scholarship Notice 2020-21.docx